INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 6 | JULY - 2023

# चंद्रपूर जिल्ह्यातील रोजंदारी तत्त्वावर काम करणाऱ्या महिला कामगारांना सामाजिक समस्या: एक अध्ययन

संदिप शे. ताजने[1] , डॉ. राधेशाम पिलाजी चौधरी[2]
[1]संशोधनकर्ता
[2] मार्गदर्शक, शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविघालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ.

## सारांश

प्रस्तुत संशोधनात चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व म्हणजे १५ तालुक्यातून प्रत्येकी ५० याप्रमाणे रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या एकुण ७५० महिला कामगारांकडून संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान संबंध तपासण्याकरीता काई वर्ग परिक्षण या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले.



## प्रस्तावना

चंद्रपूर जिल्हा हा विदर्भातील आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या क्षेत्रात काम करणाऱ्या बहुतांश शेतमजुर या महिला आहेत. त्याच प्रमाणे इतर क्षेत्र जसे बांधकाम, घरकाम, खणन, किरकोळ व्यवसाय इत्यादी क्षेत्रात देखील महिला कामगार कार्यरत आहेत. त्यांची संख्या ही लक्षणीय असून या श्रमशक्तीच्या बळावर विकास साधला जातो आहे. तथापि या महिलांची वास्तविक परिस्थिती काय आहे याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करण्यात येताना दिसून येत नाही. विविध व्यावसायिक व मालक त्यांचा केवळ उपयोग करून घेत असून त्यांच्या करिता सोयी सुविधांचाअभाव असल्याचे प्राथमिक अध्ययनात दिसून येते. त्यांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती कौटुंबिक जीवन, उपजीविका, बचत, उत्पन्न व खर्च इत्यादी दरम्यान विशेषतः कुटुंब व व्यवसाय या दरम्यान संतुलन साधतांना त्यांना येणाऱ्या समस्या या संबंधीच्यामाहितीचा अभाव असल्याचे आढळते.

प्रस्तुत अध्ययनातून प्राप्त परिणामांवरून वरील बाबींची माहिती उघडकीस येऊन या परिणामांचा उपयोग रोजंदारी तत्त्वावर काम करणाऱ्या महिला कामगाराकरिता कल्याणकारी उपाययोजना आखण्यात होऊ शकेल. त्याचप्रमाणे मालक किंवा व्यावसायिकांचे लक्ष महिला कामगांराच्या समस्यांकडे वेधून घेता येऊ शकेल. तसेच त्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अंदाज येऊन त्यात कशा प्रकारे सुधारणा करता येऊ शकेल व त्यातील कोणते घटक महिलांच्या सर्वांगिण विकासात महत्त्वपूर्ण राहतील याचा आढावा घेता येईल. कौटुंबिक जीवनात त्यांना येणाऱ्या समस्या व यावर प्रभाव करणारे विविध घटक याची माहिती प्राप्त होऊन सामाजिक कल्याण प्रक्रियेत या माहितीचा उपयोग करून घेता येईल. याच अनुषंगानेसंशोधनकर्त्याने खालील विषय संशोधनाकरिता निवडण्याचे ठरविले आहे.

**सारणी क्रमांक १ :सामाजिक समारोह किंवा समारंभात सहभागी होण्याकरिता पुरेसा वेळ मिळण्यासंदर्भात रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगारांच्या प्रतिक्रिया**

| सहभागी होण्याकरिता पुरेसा वेळ | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७१३ | ९५.० |
| नाही | ३८ | ५.० |
| **एकूण** | **७५०** | **१००.०** |
| **Chi-s** | **DF** | **P- Value** |
| **607.501** | **1** | **<0.05** |

Chi-S. काई वर्ग मूल्य-; DF (Degrees of freedom) स्वातंत्र्यांश; P Value – P मूल्य

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये सामाजिक समारोह किंवा समारंभात सहभागी होण्याकरिता पुरेसा वेळ मिळण्यासंदर्भात रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगारांच्या प्रतिक्रिया दर्शविलेल्या आहेत. वरील सारणीत असे दिसून येते की, ९५.० टक्के महिला कामगारांना सामाजिक समारोह किंवा समारंभात सहभागी होण्याकरिता पुरेसा वेळ मिळत असून ५.० टक्के महिला कामगारांना सामाजिक समारोह किंवा समारंभात सहभागी होण्याकरिता पुरेसा वेळ मिळत नाही. सामाजिक समारोह किंवा समारंभात सहभागी होण्याकरिता पुरेसा वेळ मिळण्यासंदर्भात महिला कामगारांच्या प्रतिक्रियांची तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य –६०७.५०१; स्वातंत्र्यांश:-१; P मूल्य <०.०५) अंतर दिसून येते. यावरून रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महत्वपूर्णपणे अधिक महिला कामगारांना सामाजिक समारोह किंवा समारंभात सहभागी होण्याकरिता पुरेसा वेळ मिळतो असे दिसून आले.

**सारणी क्रमांक २ :रोंजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगार कार्यरत असलेल्या क्षेत्रातील समाजाचा त्यांच्या प्रती व्यवहार**

| कार्यरत असलेल्या क्षेत्रातील समाजाचा प्रती व्यवहार | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|
| अतीउत्तम | २३ | ३.० |
| उत्तम | ७१३ | ९५.० |
| साधारण | १५ | २.१ |
| असमाधानकारक | - | - |
| **एकूण** | **७५०** | **१००** |
| **Chi-s** | **DF** | **P- Value** |
| **3649.3** | **3** | **<0.05** |

Chi-S. काई वर्ग मूल्य-; DF (Degrees of freedom) स्वातंत्र्यांश; P Value – P मूल्य

प्रस्तुत सारणी क्रमांक २ मध्ये रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगार कार्यरत असलेल्या क्षेत्रातील समाजाचा त्यांच्या प्रती असलेल्य व्यवहारासंबंधी माहिती दर्शविलेली आहे. वरील सारणीत असे दिसून येते की, ९५.० टक्के रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगार कार्यरत असलेल्या क्षेत्रातील समाजाचा त्यांच्या प्रती असलेला व्यवहार उत्तम असून कार्यरत असलेल्या क्षेत्रातील समाजाचा व्यवहार अतीउत्तम व साधारण आहे हे नमूद करणाऱ्या महिला कामागारांची टक्केवारी क्रमशः ३.० टक्के व २.१ टक्के असल्याचे आढळले. रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगार कार्यरत असलेल्या क्षेत्रातील समाजाचा त्यांच्या प्रती असलेल्य व्यवहारासंबंधी माहितीची तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य –३६४९.३; स्वातंत्र्यांश-३; P मूल्य <०.०५) अंतर दिसून येते. म्हणजेच रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या बहुतांश महिला कामगार कार्यरत असलेल्या क्षेत्रातील समाजाचा त्यांच्या प्रती असलेला व्यवहार उत्तम असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक ३ :समाजातील लोकांद्वारे रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगारांसोबत भेदभाव करण्यासंदर्भात त्यांच्या प्रतिक्रिया**

| समाजातील लोकांद्वारे भेदभाव | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ८३ | ११.० |
| नाही | ६६७ | ८९.० |
| माहित नाही | - | - |
| **एकूण** | **७५०** | **१००** |
| **Chi-s** | **DF** | **P- Value** |
| **1057.112** | **2** | **<0.05** |

Chi-S. काई वर्ग मूल्य-; DF (Degrees of freedom) स्वातंत्र्यांश; P Value – P मूल्य

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये समाजातील लोकांद्वारे महिला कामगारांसोबत भेदभाव करण्यासंदर्भात रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगारांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत असे दिसून येते की, ८९.० टक्के महिला कामगारांसोबत समाजातील लोक भेदभाव पाळत नसून ११.० टक्के महिला कामगारांसोबत समाजातील लोक भेदभाव पाळत असल्याचे आढळले. समाजातील लोकांद्वारे महिला कामगारांसोबत भेदभाव करण्यासंदर्भात त्यांच्या प्रतिक्रियाची तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य –१०५७.११२; स्वातंत्र्यांश-२; P मूल्य <०.०५) अंतर दिसून येते. यावरून रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महत्वूपर्णपणे अधिक महिला कामगारांसोबत समाजातील लोक भेदभाव पाळत नसल्याचे दिसून येते.

**सारणी क्रमांक ४ :मालकाद्वारे सम्मानपुर्वक वागणूक मिळण्यासंदर्भात रोंजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगारांच्या प्रतिक्रिया**

| मालक आपल्यासोबत सम्मानपुर्वक वागतात | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७२८ | ९७.१ |
| नाही | १४ | १.९ |
| सांगता येत नाही | ८ | १.० |
| **एकूण** | **७५०** | **१००** |
| **Chi-s** | **DF** | **P- Value** |
| **1370.976** | **2** | **<0.05** |

Chi-S. काई वर्ग मूल्य-; DF (Degrees of freedom) स्वातंत्र्यांश; P Value – P मूल्य

उपरोक्त सारणी क्रमांक ४ मध्ये मालकाद्वारे सम्मानपुर्वक वागणूक मिळण्यासंदर्भात रोंजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महिला कामगारांच्या प्रतिक्रिया दर्शविलेल्या आहे. वरील सारणी असे दिसून येते की, ९७.१ टक्के महिला कामगारांना मालकाद्वारे सम्मानपुर्वक वागणूक मिळत असून १.९ टक्के महिला कामगारांना मालकांद्वारे सम्मानपुर्वक वागणूक मिळत नसल्याचे दिसून आले. तसेच मालकांद्वारे सम्मानपुर्वक वागणूक मिळण्यासंदर्भात अनिश्चितता दर्शविणाऱ्या महिला कामगारांची टक्केवारी १.० टक्के असल्याचे निदर्शनास आले. मालकाद्वारे सम्मानपुर्वक वागणूक मिळण्यासंदर्भात महिला कामगारांच्या प्रतिक्रियांची तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य –१३७०.९७६; स्वातंत्र्यांश-२; P मूल्य <०.०५) अंतर दिसून येते. म्हणजेच रोंजंदारी तत्वावर काम करणाऱ्या बहुतांश महिला कामगारांना मालकाद्वारे सम्मानपुर्वक वागणूक मिळत असल्याचे निदर्शनास आले.

## निष्कर्ष

चंद्रपूर जिल्ह्यातील रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महत्वपूर्णपणे अधिक महिला कामगारांना सामाजिक समारोह किंवा समारंभात सहभागी होण्याकरिता पुरेसा वेळ मिळतो. रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या बहुतांश महिला कामगार कार्यरत असलेल्या

क्षेत्रातील समाजाचा त्यांच्या प्रती असलेला व्यवहार उत्तम आहे. रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या महत्वूपर्णपणे अधिक महिला कामगारांसोबत समाजातील लोक भेदभाव पाळत नाही. रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या बहुतांश महिला कामगारांना मालकाद्वारे सम्मानपुर्वक वागणूक मिळते. महिला कामगारांसोबत काम करणाऱ्या कामगारांचा त्यांच्यासोबत असलेला व्यवहार सलोख्याचा आहे.

## संदर्भग्रंथ सूची


१) अळतेकर ए. एस. 'द पोझिशन ऑफ वुमेन इन हिंदू सिव्हिलायझेशन', नवी दिल्ली, १९६२.

२) अहिरवाडकर ल. जा., देशकर ग. द. - 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे', अजय प्रकाशन, तृतीय आवृत्ती, १९७५.

३) अनंतराम शरयू, वडसे उमा - 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९७.

४) आचार्य - 'मध्ययुगीन भारत', प्रकाशन, भा. ल. कुलकर्णी साहित्य प्रसार केंद्र नागपूर

५) आंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा. -'भारतीय कामगार समस्या व कामगार विधान' ,प्रकाशन महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती, विजयनगर, पुणे, १९७९

६) इंडियन टेक्सटाईल्स इंडस्ट्रियल स्टॅटॅस्टिकल बुलेटीन, टेक्स्टाईल कमिशनर प्रकाशन, १९६१.

७) काळदाते सुधा - ''औद्योगिक समाजशास्त्र'', नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९८२.

८) काचोळे दा. धो. - 'भारतीय सामाजिक विचारवंत', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९.

९) काचोळे दा. धो. - 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशन गृह, मुंबई ऑगस्ट, १९८०.

१०) कुलकर्णी एम जी. - 'भारतीय समाजव्यवस्था', प्रकाशक श्री. बा. दाशरथे, परिमल प्रकाशन, खडकेश्वर, औरंगाबाद, नोव्हें, १९९७.

११) कोलारकर श. गो. - 'भारताचा इतिहास', मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर, २९ मार्च १९८४.

१२) कुचेल एस. सी. - 'द इंडस्ट्रियल इकॉनॉमी ऑफ इंडिया, १९८८.

१३) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम १९७० अंतर्गत दिलेल्या नोंदणी प्रमाणपत्र /अनुज्ञप्तीबाबतची माहिती, कामगार उपआयुक्त कार्यालय, औरंगाबाद २००९.

१४) खंडागळे चंद्रकांत - 'भारतीय समाज' , प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे गणेशनगर, सांगली, जुलै १९९८.

१५) गाडगीळ पा. वा. - 'भारताचे आर्थिक नियोजन' प्रकाशक - सु. दे. जोशी, दि. दि. लोखंडे-टिळक रस्ता, पुणे, १९७०.

१६) सेनगुप्ता पद्मिनी - 'वुमेन्स वर्क्स ऑफ इंडिया' आशीया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९६०.

१७) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री प्रमुख संपादक मराठी विश्वकोश, खंड तिसरा.

१८) तुळपुळेबगाराम - ''कामगार आकांक्षा आणि आव्हान'', साधना प्रकाशन, पुणे, १९७१.

१९) देसाई के. जी. - 'ह्युमन प्रॉब्लेम इन इंडस्ट्रीज', सिंधू पब्लिकेशन मुंबई, १९६१

२०) देशमुख प्रभाकर, 'श्रमाचे अर्थशास्त्र', विद्या प्रकाशन, नागपूर १९७६.

२१) नाडगोंडे गुरूनाथ - 'औद्योगिक समाजशास्त्र' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, ३०, २०००.

२२) पांडे रेखा, नीलिमा उपाध्ये - 'वुमन इन इंडिया पास्ट अँड प्रझेन्ट' प्रकाशन अलाहाबाद, इंडिया १९९०.

२३) फुले सुशीला - 'कामगार स्त्री', संवेदन प्रकाशन, औरंगाबाद, २००२.